❈ प्रकरण तिसरे ❈

# डॉ.पतंगराव कदम यांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य

## ❋ प्रकरण तिसरे ❋

# डॉ.पतंगराव कदम यांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य

**प्रास्ताविक -**

१९ वे शतक भारतामध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणांचे शतक म्हणून ओळखले जाते. भारत मध्ययुगातून आधुनिक युगात प्रवेश करीत होता. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस भारत राजकीय दृष्टया विभागलेला व सामाजिक दृष्टया पोखरलेला देश होता. आर्थिक दृष्टया मागासलेल्या व शोषित असा देश होता. अध्यात्मिक दृष्टया सुध्दा भारताची परिस्थिती काही फारशी आशादायक नव्हती. भारताची सर्वच आघाडीवर शोचनीय स्थिती झालेली होती. या पार्श्वभूमीवर इंग्रजांनी या देशात आपली सत्ता प्रस्थापित केली. भारतामध्ये भारतीय पुनरूज्जीवनाची सुरूवात बंगालमध्ये राजा राममोहन रॉय व त्यांच्या ब्राम्हो समाजाने केली विशेषतः महाराष्ट्रात हा विचार अतिशय वेगाने पोहोचला. महाराष्ट्राला मध्ययुगापासून मोठी वैचारिक परंपरा लाभली आहे. महाराष्ट्रात काही बाबतीत ब्राम्हो समाजापूर्वीच उच्च वैचारिक स्तर गाठला होता. महाराष्ट्रामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक सुधारणा चळवळ संत गाडगे महाराज, महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ते आजच्या अण्णा हजारे, बाबा आमटे, बाबा आढाव, सिंधूताई सपकाळ यांच्या पर्यंत अनेक उदाहरणे सांगता येतील. डॉ.पतंगराव कदम यांनीही त्यांच्या पध्दतीने त्यांच्या मतदार संघात, जिल्हयात व महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी शिक्षणातून समाज परिवर्तन तसेच अनेक लोकांना छोटया-मोठया मदती देऊन सामाजिक व सांस्कृतिक कार्य केले आहे.

### ♦ डॉ.पतंगराव कदम यांचे शिक्षणातून सामाजिक परिवर्तनाचे कार्य -

सामाजिक या शब्दांमध्ये समाजाची पुनर्रचना असा अर्थ अभिप्रेत आहे. ही सामाजिक वर्तणूक, चालीरीती, समाजरचना व समाज नियंत्रण यावर अवलंबून असते. कोणत्याही सामाजिक चळवळीचा प्रधान हेतू समाजाची पुनर्रचना करणे त्याप्रमाणे वेगवेगळया समाजघटकांना एकत्र आणणे असा असतो. मत परिवर्तन आणि समाज-परिवर्तन करण्याचा ध्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांनी घेतला होता आणि परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होण्यासाठी दोन गोष्टी त्यांनी आवश्यक मानल्या. एक

शिक्षण आणि दुसरी लोकजागृती, महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांपासून महर्षि कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाकडून, लोकशिक्षणाकडे जाणे पसंत केले. महात्मा फुले यांनी शिक्षणाबरोबर मुलींच्या शिक्षणावरही भर दिला आणि त्यामुळे शिक्षणाच्या चळवळीची दिशा ही ग्रामीण शिक्षण आणि मुलींचे शिक्षण इकडे वळली परंतु या चळवळीलाच ग्रामीण महाराष्ट्राच्या दिशेने नेण्याचे काम डॉ.पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून केलेले आहे. ''डॉ.पतंगराव कदम यांनी सांगली जिल्हयाबरोबर महाराष्ट्रामध्ये निरपेक्ष बुध्दीने निःपक्षपातीपणाने जनसामान्यांच्याा कल्याणासाठी किती तरी विधायक कामे करून नियोजन, कार्यपध्दती, परिपूर्तीचा आनंद या सर्वाचा अभ्यास करून पुस्तकरूपाने लिहिल्यास तो एक सामान्यांप्रमाणे समाज कार्यकर्त्यानाही प्रेरणा व दिशा देण्यासाठी उपयुक्त असा संदर्भ ग्रंथ ठरेल यात संदेह नाही''[१] डॉ.पतंगराव यांनी सामाजिक, राष्ट्रीय प्रश्नासंबंधीचे अभ्यासपूर्ण विविध योजना शासन दरबारी सादर करून त्या राबविणे यात कोठेही कुचराई केली नाही. उदा.बेकारी व गरिबी हटाव यासाठी केवळ वायफळ वाच्यता न करता तरूणांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे सहकारी, निमसरकारी व विविध मंडळामध्ये नोकरीची संधी देऊन समाजामध्ये मानाने जगता यावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले आहेत. गरिबी, बेरोजगारी याबरोबरच शिक्षणाचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात साक्षरतेचे प्रमाण नगण्यच म्हणूनच डॉ.पतंगराव यांनी खानापूर तालुका आणि तासगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सुसज्ज अद्ययावत सोयीनी युक्त अशी मुलींची दोन विद्यालये व एक महाविद्यालय कडेगांव येथे काढले आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, ठाणे, मुंबई आणि दिल्ली इत्यादी जिल्हयाच्या ठिकाणी व आसपासच्या ग्रामीण भागात विविध अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन करणाऱ्या संस्था त्यांनी उभारलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

**(१) भारती विद्यापीठ मुलींचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कडेगांव (सांगली) -**

ग्रामीण भागातील दुर्बल लोकांचा आर्थिक सामाजिक व शैक्षणिक विकास व्हावा, दुर्बल लोकांची पिळवणूक थांबावी यासाठी १९९० ला कडेगाव येथे ही संस्था स्थापन केली. देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षापेक्षा जास्त वर्षे झाली परंतु ग्रामीण महिलांना आजूनही स्वातंत्र्य मिळाले नाही. आजची महिला ही सबला बनली पाहिजे ती माहेरी

असताना आईवडिलांच्या कुटुंबाचा भार पेलते तर लग्न झाल्यानंतर ती सासरच्या कुटुंबात भर घालते. जर समजा दुर्दैवाने तिच्यावर वैधव्य आले तर तिला कोणाचाही आधार मिळत नाही. तिच्यावर उपासमारीची वेळ येते अशा वेळी तिला आधार दिला पाहिजे तिच्यावर आधारित जर दोन मुले असतील तर त्यांचे संगोपन करण्याची ताकद निर्माण झाली पाहिजे त्यासाठी तिला सहकार्याच्या मार्गाने एकत्र आणून तिच्यामध्ये ते धैर्य निर्माण करून तिला स्वावलंबी बनविले पाहिजे तरच ती आपल्या पतीच्या पाठीमागे स्वतःचे चांगले संगोपन करू शकेल त्या दृष्टीने भारती विद्यापीठाने एक नवीन उपक्रम राबविला आहे तो म्हणजे खानापूर तालुक्यातील कडेगांव या खेडयातील शैक्षणिक केंद्रात महिला औद्योगिक सहकारी संस्था उभी केली आहे. आजच्या युगातील स्त्री ही स्वतःच्या पायावर उभी राहावी यासाठी आय.टी.आय.मध्ये प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये मेकॅनिक, रेडिओ आणि टी.व्ही. अभ्यासक्रम येथे शिकवला जातो. यासाठी शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण अशी आहे. हा ट्रेड उत्तीर्ण मुलींना अनेक नोकऱ्यांच्या संधीही उपलब्ध करून देतात तसेच ड्रेसमेकींग प्रमाणेच भरतकाम व विणकाम असा एक वर्षे कालावधीचा एस.एस.सी.नापास मुलींसाठी हा अभ्यासक्रम आहे. तसेच बारावी उत्तीर्ण कोणत्याही शाखेच्या मुलींना ज्यांना मराठी विषयात ५० टक्के गुण आहेत त्यांना शॉर्टहँडचे प्रशिक्षण देतात. यामध्ये लघुलेखनाची गती शंभर शब्द प्रति मिनीट व टायपिंग अशी तयारी करून घेतात हा कालावधी एक वर्षाचा आहे एकूण चार ट्रेडला ९६ मुली दरवर्षी प्रशिक्षण घेतात. ग्रामीण भागातील महिलासुध्दा आधुनिक युगात काहीतरी करून दाखवितात याचे उदाहरण म्हणजे कडेगावचे महिला औद्योगिक संस्था होय.

## (२) श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम महिला महाविद्यालय कडेगांव (सांगली)-

१ जुलै १९९० रोजी शासनाकडून परवानगी मिळालेले आणि कला, विज्ञान व वाणिज्य अशा तीनही विद्याशाखा असलेले कन्या महाविद्यालय अथक प्रयत्नातून सुरू झाले. "भारती विद्यापीठाच्या तीन तपांची निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम राखत खेडया-पाडयातून वाडया-वस्त्यातून दगडधोंडयातून ठेचकळत येणाऱ्या आणि पावसाळयात गुडघाभर चिखल तुडवत चालणाऱ्या या मुलींच्या आयुष्याला अर्थपूर्ण आकार

देण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने केला आहे.''[२] हे करत असताना अर्थातच गुणात्मक आणि संख्यात्मक विकासही साधला आहे. अवघ्या १०१ विद्यार्थिनीशी सुरू झालेल्या या महाविद्यालयाची आज विद्यार्थिनींची संख्या ६००च्यावर पोहचली आहे. पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणाहून येऊन पालक आपल्या मुलींना इथल्या वसतिगृहात आणि महाविद्यालयात प्रवेश देण्यासाठी आग्रह धरू लागले आहेत ही भारती विद्यापीठाची व महाविद्यालयाच्या कार्याची पोच आहे. संख्यात्मक विकासाबरोबर गुणात्मक विकासातही महाविद्यालय आघाडीवर आहे. गेल्या दशकातील सर्व निकाल ९० % च्या पुढे आहेत.

**कन्या महाविद्यालयाचे यश व संयोजनपद -**

१४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यात 'घोटभर पाणी' या एकांकिकेस प्रथम क्रमांक मिळाला व २० व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात 'पार्टनर्स' या एकांकिकेस प्रथम क्रमांक मिळाला आहे तसेच शिवाजी विद्यापीठ १४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन, समाज प्रबोधन सप्ताहाचे संयोजन, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद ८ व्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन, तसेच शिवाजी विद्यापीठ २० व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन कन्या महाविद्यालयाने केले होते. अशा प्रकारे विविध कार्यक्रमाचे उत्तम आयोजन व सांस्कृतिक कार्यक्रमात आग्रेसर असे ग्रामीण भागातील महिला महाविद्यालय आहे. खेडया-पाडयातून येणाऱ्या या मुलींसमोर अनेक समस्या उभ्या होत्या आडवळणी असलेली गावे, एस.टी.च्या गैरसोयीच्या वेळा, पालकांची हलाखीची स्थिती इ.मुळे उच्च शिक्षणाची सोय होऊनही या मुलींना दुरापास्त होण्याची शक्यताच जास्त होती शिवाय शेतकऱ्याच्या कष्टकऱ्याच्या घरातील दारिद्रय त्या दारिद्रयाच्या घरादारात उमटलेल्या खुणा यामुळे इच्छा असली तरी अनेक पालक हतबल होतात या सगळयांची जाणीव असलेले संस्थापक डॉ.पतंगराव कदम यांनी यावर मात करण्यासाठी महाविद्यालयाबरोबर कन्या वसतिगृह सुरू केले. आणि त्यासाठी तीन मजली इमारत उभी केली. एकूण ४०० मुली राहण्याची सोय आहे.

**दत्तक योजना -**

खेडयापाडयातील मुलींच्या गरजा जाणून त्यांच्या शिक्षणाला पोषक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने डॉ.पतंगराव कदम यांनी कडेगावच्या शैक्षणिक

संकुलची उभारणी केली. शिक्षणाचे महत्त्व सर्वांना पटले असले तरी गरिबीची दाहकता जवळून अनुभवलेल्या आणि गरिबीचे चटके सोसलेल्या संस्थापकांनी या शैक्षणिक केंद्रातील अनेक मुलींना विविध प्रकारच्या आर्थिक सोयी-सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. वसतिगृह, निवासखर्च, भोजनखर्च, एस.टी.पास, शैक्षणिक फी यासारख्या विविध खर्च संस्थेने उचलला आहे. ''मानवतावादी दृष्टिकोनातून मुलींसाठी दत्तक-योजना सुरू केली. या योजनेतील सर्व मुलींचा पदवीपर्यंतचा संपूर्ण खर्च संस्थेने स्वतः केला. पालकांनी आपल्या मुलींचा एकदा प्रवेश घेतल्यानंतरची पालकत्त्वाची सर्व जबाबदारी भारती विद्यापीठाने स्वीकारली. पहिल्या वर्षी वसतिगृहात प्रवेश घेतलेली पूर्ण बॅच भारती विद्यापीठाने वसतिगृहातील विद्यार्थिनींना निवास फी, भोजन फी, एस.टी.बस या कारणासाठी केलेला खर्च रू.३४,२६,९४५ इतका आहे. यापैकी वसतिगृहासाठीचा खर्च रू.३१,२५,३६९ इतका आहे.''[३] या शैक्षणिक केंद्रात २००० मुली शिक्षण घेतात. सगळयाच मुली शिक्षणापासून वंचित राहिल्या असल्या असे नाही. मात्र बहुतेक मुलींच्या शिक्षणाला अर्धचंद्र मिळाला असता हे नक्की.

**(३) महात्मा ज्योतिबा फुले प्रशाला शिंदेवाडी-वेळू (भोर) पुणे -**

भोर तालुक्यातील शिंदेवाडी-वेळू परिसरातील मुलींना दूरच्या अंतरावर पालक पाठवू शकत नसल्याने या पंचक्रोशीतील अनेक मुली व मुले शिक्षणापासून वंचित राहिली. या मुलांच्या शिक्षणाला संधी मिळावी म्हणून १९८२ पासून हे हायस्कूल सुरू केले.

अशा प्रकारे समाजामध्ये स्त्रिया स्वावलंबी आत्मनिर्भर बनल्याशिवाय समाजजीवन संपन्न व सुसंस्कृत होणार नाही. राष्ट्र उभारणीसाठी सुध्दा स्त्रीशिक्षणाच्या कार्याचे महत्त्व अनन्य साधारण आहे त्यादृष्टीने नवीन पिढीतील महिला अबला न राहता सबला झाल्या पाहिजेत या भूमिकेतून भारती विद्यापीठाने स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात हाती घेतलेले कार्य वैशिष्टयपूर्ण व अपूर्व योगदानाचे असे आहे.

**डॉ.पतंगराव कदम यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान -**

डॉ.पतंगराव यांनी फक्त आपल्या मतदार संघापुरतेच सामाजिक कार्य न करता संपूर्ण महाराष्ट्रभर सामाजिक कार्य विविध क्षेत्रात केले आहे.

## (१) श्रीपतराव कदम यात्री निवास, पंढरपूर -

ऑगस्ट १९९८ साली श्रीपतराव कदम यात्री निवासचे भूमिपूजन थोर गांधीवादी विचारवंत बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते झाले. पंढरपूर हे देशाची दक्षिण काशी म्हणून प्रसिध्द आहे येथे सर्व देशभरातून आषाढी व कार्तिकेला लोक येतात त्यांची राहण्याची सोय व्हावी यासाठी ३५ लाख रूपयाचे श्रीमती बयाबाई कदम महिला निवास व श्रीपतराव कदम यात्री भवन बांधले आहे. या निवासात यात्रेच्या वेळेस अनेक समाजप्रबोधनपर कार्यक्रम होतात. डॉ.पतंगराव कदम यांचे घराणेही वारकरी संप्रदायातील त्यांचे वडील श्रीपतराव कदम व मातोश्री बयाबाई दर आषाढी व कार्तिकेला न चुकता यात्रेला येत असत त्यांच्या बरोबर लहानपणी डॉ.पतंगराव कदम व त्यांचे भावंडे येत असत त्यामुळे डॉ.पतंगराव यांनी वारकऱ्यांच्या समस्या जवळून पाहिल्या आहेत यावरून त्यांच्या मनात ही कल्पना आली व पंढरपूरात भव्य आणि दिव्य यात्री निवास बांधले आहे.

## (२) लघुऔद्योगिक वसाहती -

औद्योगिक दृष्टया महाराष्ट्र संपूर्ण देशात आघाडीवर असला तरी महाराष्ट्रात काही विशिष्ट प्रदेशांमध्येच उदयोगधंदयाची मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. हा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी उदयोगधंदयाची वाढ ग्रामीण भागात व्हावी यासाठी डॉ.पतंगराव कदम यांनी कडेगांव, विटा आणि पलूस, जि.सांगली या ठिकाणी लघुऔद्योगिक वसाहती उभारण्यास शासकीय मान्यता मिळवली आहे. त्यामुळे भागातील बऱ्याच लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे व सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## रस्ते, पूल व इतर विकास कामे -

डॉ.पतंगराव कदम यांचा भिलवडी-वांगी मतदार संघ हा कायमस्वरूपी दुष्काळी मतदार संघ म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहे. १९७८ साली खानापूर-आटपाडी या मतदार संघातून भिलवडी-वांगी हा मतदार संघ उदयाला आला. डॉ.पतंगराव कदम राजकारणात सक्रिय होण्याच्या अगोदरपासून तालुक्याच्या विकासासाठी कार्यरत आहेत. ते ज्या दुष्काळी तालुक्यात जन्मले त्या लोकांचे दारिद्रय तेथील लोकांच्या समस्या, रस्त्यांची झालेली दुरावस्था, लोकांच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न तर दुरच परंतु पिण्याच्या पाण्याचीही

समस्या मोठया प्रमाणात होती. त्या सर्व प्रश्नांची जाण जवळून पतंगराव कदम यांना होती. तत्पर वाहतुकीसाठी उत्तम रस्त्यांची आवश्यकता असते. महाराष्ट्रात २८८ विधानसभा मतदार संघ आहेत परंतु प्रत्येक मतदार संघातील लोकप्रतिनिधी कार्यक्षम असेलच असे नाही परंतु महाराष्ट्रातील कार्यक्षम असे जे अनेक लोकप्रतिनिधी आहेत त्यात डॉ.पतंगराव कदम यांचा आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे. जर मतदार संघाचा लोकप्रतिनिधी कार्यक्षम असेल तरच त्या मतदार संघाचा विकास होतो असे आपणाला आढळून येते, त्याप्रमाणे डॉ.पतंगराव कदम यांनी मतदार संघाच्या विकासासाठी पुढील शासनाच्या योजना सामान्य माणसांच्या घरापर्यंत पोहचविल्या आहेत. जलद वाहतूकीसाठी रस्त्यांची आवश्यकता असते यासाठी कराड व तासगांव या राज्यमार्गाचे नूतनीकरण करून घेतले आहे कारण कराड व तासगांव ही गावे शेतकऱ्यांच्या बाजारपेठेच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत त्यामुळे शेतकऱ्याच्या दृष्टीने दळणवळण सुलभ झाले आहे. कृष्णा नदी काठाने जाणारा ताकारी ते भिलवडी हा रू ३५ लाखाचा रस्ता तयार करून घेतला आहे. शेळकबाव येथील लोकांना येरळा नदीवरून दळणवळणाची चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून सहा लाख रूपये खर्चाची शासकीय मंजूरी मिळवून फरशीवजा पूल बांधून घेतला आहे. त्यामुळे शेळकबाव परिसरातील लोकांना दळवळणासाठी फायदा झाला आहे. अशाच प्रकारचा पूल येरळा नदीवर नेवरे गावातील लोकांसाठी उभा केला आहे, २६ लाख रूपये खर्चाचा पूल परिसरातील बारा गावांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरला आहे. तडसर व शिरसगांव या गावाला जाणारा डांबरीकरणाचा रस्ता नव्हता, तेथील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट होती तेथे शासनाकडून १५ लाख रूपये खर्चाचा डांबरीकरणासह रस्ता तयार करून घेतला. अशाच प्रकारे त्या त्या परिसरातील जनतेच्या रस्त्यांची अडचणी लक्षात घेऊ न येडे-शाळगांव, न्हावी, कडेगांव, सोनसळ, सोनकिरे, चिंचणी, वाजेगांव, कडेगांव परिसर रस्ते डॉ.पतंगराव कदम यांच्या अथक प्रयत्नातून पूर्ण झाले आहेत.

**♦ ताकारी योजना -**

सांगली जिल्हयातील दुष्काळी भागाला वरदान ठरणारी कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन योजना आहे. या योजनेतून खानापूर, तासगांव व मिरज तालुक्यातील ठराविक गावे यांचा समावेश आहे. ही योजना आशिया खंडातील दोन नंबरची योजना

आहे. या योजनेविषयी मोठया प्रमाणात साशंकता व अनिश्चितता वाटत होती पण ही योजना पूर्णत्वाच्या टप्यामध्ये आहे. या योजनेवर खानापूर तालुक्याचे उज्ज्वल भवितव्य अवलंबून आहे. या तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे बहुतांश लोक हे उदरनिर्वाहासाठी मुंबईला स्थलांतरित झाले होते त्यापैकी बहुतांशी मंडळी ही कापड गिरणीमध्ये काम करीत होती परंतु १९८२-८३ साली मुंबई गिरणी कामगारांचा संप झाला. अन्न-वस्त्रासाठी हा कामगार महाग झाला अशी परिस्थिती झाल्यानंतर पर्याय नसल्यामुळे खानापूर सारख्या दुष्काळी तालुक्यातील कामगाराला आपल्या गावी परतावे लागले व तालुक्याच्या दारिद्र्यात अधिकच भर पडली.

९ नोव्हेंबर १९८३ हा दिवस सांगली, सोलापूर या दुष्काळग्रस्त जिल्हयातील तालुक्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. या दिवशी यशवंतराव चव्हाण देवराष्ट्रास त्यांच्या जन्मगांवी आले होते त्यांच्या समवेत शालिनीताई पाटील होत्या. लोकसभेच्या सांगली मतदारसंघाची पोटनिवडणूक सुरू होती. लोकसभेचा राजीनामा देऊन वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून दाखल झाले होते. लोकसभेची ही पोटनिवडणूक शालिनताई पाटील कॉंग्रेस उमेदवार म्हणून लढवित होत्या त्यासाठी यशवंतराव चव्हाण यांची प्रचारसभा देवराष्ट्रे या गावी आयोजित केली होती. प्रचारसभा झाली. चहा-पाण्याच्या वेळी देवराष्ट्रेसह गणपतराव मोरे तसेच शेजारच्या दोन-तीन गावांच्या कार्यकर्त्यांनी या दोघांना गराडा घातला आणि सांगितले, कृष्णेचे पाणी सागरेश्वराच्या खिंडीतून आमच्या दोन-तीन गावांना मिळाले पाहिजे ठोस होकार मिळाल्याखेरीज आम्ही आपणास इथून सोडणार नाही. 'कार्यकर्त्यांनी हा एकाकी घेतलेला पवित्रा पाहून चव्हाणसाहेब चाट पडले, म्हणाले तुमचे मागणे रास्त आहे. पोटतिडकीने तुम्ही ते मागत आहात पण मला तुम्ही कोंडित पाडू नका. मी आता थकलोय आता शालिनीताईच सर्वेसर्वा आहेत. काय आणि कसे सांगायचे ते त्यांनाच सांगा. कार्यकर्त्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे शालिनीताई बावरल्या होत्याच त्या म्हणाल्या प्रयत्न करेन. "हे असे मोघम बोलणे चालणार नाही, कार्यकर्त्यांनी गलका केला, आम्हास ठोस आश्वासन पाहिजे." 'ठिक आहे' शालिनीताई आत्मविश्वासाने बोलल्या काहीही मार्ग काढेन आणि कृष्णेचे पाणी तुमच्या शिवारात नक्कीच पोहोचवेन. कार्यकर्त्यांनी टाळयांचा कडकडाट केला नुसता टाळयाच नाही तर या मोकळया मैदानात आत्ताच भूमिपूजन करून कुदळ मारा असे

सांगितले, दोघानीही होकार दिला.''[४] देवराष्ट्रयाचे प्रसिध्द वे.शा.सं.भास्करशास्त्री शिराळकर यांनी भूमिपूजनाची लगेच तयारी केली श्रीफळ वाढवून चव्हाणसाहेबांनी टिकाव मारला. जमावाने यशवंतराव चव्हाण व शालिनीताई यांच्या नावाचा जयघोष केला आणि रामानंदनगर (किर्लोस्करवाडी) येथील पुढच्या सभेसाठी हेलिकॉप्टरने उड्डान केले ते सागरेश्वराच्या खिंडीतून जात असताना चव्हाण साहेबांनी वरूनच फुले आणि नारळ श्री सागरेश्वराच्या समोर सोडून दिले आणि इथेच ताकारी योजनेचा जन्म झाला! त्यावेळी वसंतदादा मुख्यमंत्री होते. ''देवराष्ट्राचा वृत्तांत शालिनीताईनी वसंतदादा पाटील यांना सांगितला त्यावेळी वसंतदादा म्हणाले, ती दोन-तीन गावेच कशाला? सागरेश्वर खिंडीतून पाणी उचलून सांगली जिल्हयाचा दुष्काळी भाग जेवढा पाण्याखाली आणता येईल तेवढा आणू या.''[५] सुरवातीला 'कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन योजना' असे नाव या योजनेला देण्यात आले नंतर सोयीच्या दृष्टीने आणि कार्यवाहीला गती मिळावी म्हणून ताकारी व म्हैशाळा असे या योजनेचे दोन भाग करण्यात आले. कागदपत्रावर अधिकृतपणे प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी भिलवडी-वांगी मतदार संघामध्ये हा भाग येतो. सांगली जिल्हयातील दुष्काळी तालुक्याचे सर्व आमदारांनी नागपूर अधिवेशनात ताकारी योजना मांडली व मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्याकडून या योजनेला प्रशासकीय मान्यता घेऊन मंजूर करून घेतली. या कामाचा विधीपूर्वक शुभारंभ वसंतदादांनी २० मे १९८४ रोजी सागरेश्वरच्या डोंगराच्या पठारावर यशवंतराव चव्हाणांच्या अध्यक्षतेखाली व वसंतदादांच्या हस्ते नारळ फोडला. सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यावरील ताकारी या गावाजवळ कृष्णा नदीच्या पात्रातून सांगली जिल्हयाच्या दुष्काळी भागासाठी पाणी द्यायचे आहे.

कृष्णा कोयना उपसा जलसिंचन योजना (ताकारी) पूर्णत्वास नेण्यासाठी डॉ.पतंगराव कदम प्रथमपासूनच प्रयत्नशील आहेत. ताकारी योजना हे डॉ.पतंगराव कदम यांनी जनसामान्यांसाठी पाहिलेले हरितक्रांतीचे स्वप्न आहे. १९८५ साली डॉ.पतंगराव कदम प्रथमतः भिलवडी-वांगी मतदार संघातून निवडून आल्यापासून त्यांनी विधानसभेत ताकारी प्रश्नावर सातत्याने आग्रही भूमिका घेतली आहे. कर्जरोख्याच्या माध्यमातून कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन योजना (ताकारी) मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. ''१९९२ साली जलसंधारण, पाटबंधारे खात्याचे मंत्रिपद सांभाळताना डॉ.पतंगराव यांनी ताकारी योजनेसाठीची आर्थिक तरतूद ५ कोटीवरून ३९ कोटी रूपयांपर्यंत वाढविण्यास शासनाकडून

मान्यता मिळवली व ताकारी योजनेचे ७ कोटी रूपये खर्चाच्या पंपहाऊस उभारणीचे काम डॉ.पतंगराव कदम यांनी कार्यान्वित केले आहे.''[६] पुढे १९९५ साली महाराष्ट्रात शिवसेना-भाजप युतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर सांगली, सातारा, सोलापूर जिल्हयातील दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या अनेक अपक्ष आमदारांनी युतीच्या शासनाला पाणी प्रश्नावरून पाठींबा दिला व युतीच्या शासनाने 'महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे स्थापन करून कृष्णा खोऱ्यातील कृष्णा-पाणी वाटप तंटा लवादाच्या निर्णयाप्रमाणे इ.स.२००० सालापर्यंत (सद्यःस्थितीत यांची मुदत केंद्रशासनाने वाढवून दिली आहे.) कृष्णा खोऱ्यातील उपलब्ध पाण्याचा पूर्ण उपयोग करण्याच्या दृष्टीने कृष्णा-कोयना सिंचन योजनेच्या ताकारी भागांतर्गत सुमारे ९.५० अब्ज घनफूट टी.एम.सी. पाणी वापरावयाचे आहे. सांगली जिल्हयातील अवर्षण प्रवण क्षेत्रासाठी सिंचनाचा लाभ मिळणेबाबत लोकांची सातत्याने मागणी होती त्यानुसार या योजनेअंतर्गत ७३७ मिटर पर्यंतच्या क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. या योजनेद्वारे जिल्हयातील खानापूर, तासगांव व मिरज या तीन तालुक्याचे एकूण २७६३० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. ही योजना चार टप्यात पूर्ण होणार आहे. या योजनेचा अंदाजित खर्च ४०२.०७ कोटी रूपये आहे. युती शासनाच्या कालखंडात तत्कालीन भिलवडी-वांगी मतदार संघाचे आमदार पृथ्वीराज देशमुख यांनीही या योजनेला गती देण्याचा प्रयत्न केला होता. पुढे १९९९ महाराष्ट्रामध्ये आघाडीचे शासन आले व डॉ.पतंगराव कदम भिलवडी-वांगी मतदार संघातून ही विजयी झाले त्यावेळेपासून त्यांनी या योजनेला गती देण्याचा प्रयत्न केला आहे. कृष्णा खोऱ्यातील रेंगाळलेल्या कामांना गती देण्याचे कार्य केले. ९ सप्टेंबर २००० हा दिवस सोनहिरा खोऱ्यातील तमाम जनतेच्या दृष्टीने सोनियाचा दिवस ठरला या दिवशी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते कृष्णा-कोयना उपसासिंचन प्रकल्पांतर्गत टप्पा क्र.१ व टप्पा क्र.२ चे उद्घाटन झाले. अशा प्रकारे डॉ. पतंगराव कदम यांनी ताकारी योजना पूर्ण व्हावी यासाठी शासन दरबारात सतत अग्रहाची भूमिका घेतली आहे. ताकारी योजनेच्या उर्वरित टप्पा क्र.३ व ४ चे काम चालू आहे.

भिलवडी-वांगी मतदार संघातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याची समस्या फार मोठया प्रमाणात होती. उन्हाळयाच्या दिवसात बायकां माणसांना दोन-दोन किलोमीटर वणवण भटकावे लागे ही अडचण लक्षात घेऊन डॉ.पतंगराव कदम यांनी २ कोटी रूपयांची

नळपाणी पुरवठा योजना शासनाकडून मंजूर करून घेतली व ती राबवली त्यामुळे जनतेचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला आहे.

वांगी-भिलवडी मतदार संघातील पिण्याच्या पाण्याची समस्या सुटल्यानंतर त्यांनी शेतीच्या पाण्याकडे लक्ष दिले. पडलेल्या पाऊसाचा थेंब थेंब जमिनीत मुरावा यासाठी शासनाची पाणी आडवा पाणी जिरवा ही योजना अत्यंत चांगल्या प्रकारे राबवून घेतली आहे. शिरसगांव येथे १.८८ लाख रूपये खर्चाचा पाझर तलाव बांधून घेतला आहे. त्यामुळे परिसरातील १३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. तसेच तडसर येथे ८.९४ लाख खर्चाचा पाझर तलाव झाल्यामुळे परिसरातील १५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. शाळगांव येथे ११.०९ लाख खर्चाचा पाझर तलाव झाल्यामुळे ३.१५ हेक्टर क्षेत्र ओलिता खाली आले आहे. नेर्ले येथे ८.८२ लाख खर्चाचा पाझर तलाव बांधल्यामुळे ६.९१ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. तसेच पाझर तलावाबरोबरच ज्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधता येतील अशी योजना राबविली आहे. उदा.चिंचणी येथे ४.५५ लाख खर्चाचा कोल्हापूर बंधाऱ्यामुळे परिसरातील ११ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. वांगी येथील २०.९२ लाख खर्चाच्या कोल्हापूर बंधाऱ्यामुळे ८४ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. खेराडी वांगी येथील ७.२७ लाख खर्चाच्या कोल्हापूर बंधाऱ्यामुळे १८ हेक्टर क्षेत्र त्या परिसरातील ओलिताखाली आले आहे.

अशा प्रकारे ज्या ज्या ठिकाणी पाऊसाचे पाणी आडवता येईल त्या ठिकाणी शेतकऱ्याच्या शेतीसाठी पाणी आडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे थोडासा जरी पाऊस पडला तरी या सर्व पाझर तलावाचा फायदा परिसरातील शेतकऱ्याला चांगल्या तऱ्हेने झाला आहे. (टीप : वर नमूद केलेली आकडेवारी सांगली जिल्हयातील लघु पाटबंधारे योजनांची (राज्यस्तरीय) १-४-१९९९ रोजीची तालुका निहाय सद्यःस्थिती दर्शविणारी पुस्तिका व महाराष्ट्रशासन व ग्रामविकास व जलसंधारण खाते या पुस्तिकेतून घेतली आहे.)

भागातील एकात्मिक विकास साधण्यासाठी खेराडी-वांगी येथे कृषि-पंढरी योजना राबविली आहे या योजनेखाली भागातील रस्त्यांची कामे, वस्त्यावरील वीजपुरवठा व विद्युतपुरवठा इ.कामे पूर्ण केली आहेत. तासगांव तालुक्याच्या पश्चिम भागाचा विकास

घडवून आणण्यासाठी तासगांव तालुका पश्चिम भाग सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना केली आहे. त्यामुळे भागातील शेतकऱ्यांना शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी त्याचा फायदा झाला आहे. तसेच औदुंबर (सांगली) येथील श्री दत्तक देवस्थान जागृत देवस्थान म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहे, या देवस्थानाला दरवर्षी पूराच्या पाण्याचा धोका निर्माण होत होता हा धोका टाळण्यासाठी डॉ.पतंगराव कदम यांनी ५२ मीटर लांब ६५ लाख रूपये खर्चाची पूरसंरक्षक भिंत तयार करून घेतली आहे त्यामुळे पुराच्या पाण्याचा धोका कायमस्वरूपी टाळला गेला आहे. अशा प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांनी स्वतःच्या मतदार संघाबरोबरच जिल्हयात अनेक समाजपयोगी कामे पूर्ण केली आहेत.

**♦ डॉ.पतंगराव कदम यांनी स्थापन केलेली भारती मुद्रणालय व विचार भारती द्वैमासिक यांचे कार्य -**

संस्थेच्या छपाईचे काम वाढले त्यामुळे छपाई खर्चावर जास्त पैसा खर्च होऊ लागला म्हणून भारती विद्यापीठ संस्थेने प्रेस काढण्याचे ठरविले त्या प्रेससाठी भांडवल म्हणून दि बँक ऑफ महाराष्ट्रला कर्जाची मागणी केली त्यावेळेस बँकेने संस्थेची मालमत्ता गहाण ठेवण्यास सांगितले व दोन मोठे श्रीमंत जामिनदार मागितले. त्यावेळी संस्थेचे मार्गदर्शक थोर विचारवंत श्री यशवंतराव मोहिते यांनी ही सविस्तर माहिती सांगितली " ते म्हणाले, तुम्ही स्वतः पतंगराव बँक काढा. तेव्हा लहान-लहान कार्यकर्त्यांनी दीड लाखाचे शेअर्स भांडवल एका महिन्यात जमा केले."[७] व भारती सहकारी बँक पुणे ही भोंडे बिल्डींग, पुणे येथे सुरू केली. श्री दळवी, श्री बी.एल.चव्हाण यांनी बँक रजिस्टर केली. त्या बँकेमार्फतच पुढे १९७० साली अक्षय तृतीयेच्या मुहर्तावर भारती प्रिंटींग प्रेस सुरू केली त्यावेळी तिचे भांडवल ८ हजार रूपयाचे होते आज ते ३० लाखापेक्षा जास्त आहे. पुढे १९७१ साली प्रकाशन विभागही सुरू केला. २६ जानेवारी १९७१ साली 'विचार-भारती' द्वैमासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. पुण्यात राष्ट्रभाषा सभेचा प्रेस होता या प्रेसमध्ये मु.मा.जगताप हे प्रमुख होते त्यांच्या सहकार्याने भारती प्रिंटींग प्रेस सुरू केला. सुरवातीपासून श्री बा.ग.पवार १९८० पर्यंत त्याचे संपादक होते. आज भारती प्रिंटींग प्रेसची अत्याधुनिक दुमजली सुसज्ज अशी इमारत बांधलेली आहे. ९ मे १९७९ रोजी 'रयत सेवक कर्मवीर भाऊराव पाटील' हा ग्रंथ या प्रेसमधून मुद्रित व प्रकाशित करून भारती विद्यापीठाने पुस्तक-

प्रकाशन विभागाची सुरवात केली. संस्थेचे अध्यक्ष श्री यशवंतराव मोहिते यांच्या 'पन्हाळा शिबीरातील भाषणाचा' ग्रंथ १४-२-१९७७ रोजी प्रकाशन विभागातर्फे प्रकाशित केला तसेच 'पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य' या पुस्तकाचे प्रकाशन भारती विद्यापीठाने केले. संस्थेचे अध्यक्ष श्री यशवंतराव मोहिते कृषि व सहकार मंत्री असताना त्यांनी 'शुगरकेन इंडस्ट्री ऑफ महाराष्ट्र' ही शासकीय पुस्तिका लिहिलेली होती. हे पुस्तक इंग्रजीमध्ये लिहिलेले होते. ऊस उद्योगावर मराठीत पुस्तक नव्हते ऊसापासून कोणकोणते उद्योग निर्माण करता येतील याची माहिती या पुस्तकातून शेतकऱ्यांना मिळणार होती. पुस्तक मराठीत छापण्याची शासनाकडून परवानगी मिळवली. साखर कारखान्यांमध्ये शिक्षण फंड असतो या फंडातून कारखान्यांनी पुस्तकाच्या प्रती विकत घेऊन सभासद-शेतकऱ्यांना द्याव्यात असा सहकार खात्यामार्फत व साखर संचालकांमार्फत आदेश काढण्याची व्यवस्था पतंगराव यांनी केली. या पुस्तकाच्या आलेल्या विक्रीतून 'शंकरराव मोरे' या विद्यालयाची इमारत बांधली गेली. 'विचार भारती' हे द्वैमासिक केवळ भारती विद्यापीठाची माहिती देणे एवढेच मर्यादित स्वरूप या मासिकाचे नाही. ग्रामीण भागातील अनेक नवोदित व प्रतिभावंत लेखक कवी पुढे येण्यासाठी धडपडत असतात त्यांच्यासाठी 'विचार-भारती' हे व्यासपीठ निर्माण केले आहे.''[८] यामध्ये नामवंत लेखकांचे विचारवंताचे लेख प्रकाशित केले जातात. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला-क्रीडा इ. सर्व विषयांवर तज्ञांचे वाचनीय असे लेख प्रकाशित केले जातात. प्रत्येक अंकात भारती विद्यापीठ वार्ता हा विभाग असतो. संस्थेमध्ये घडणाऱ्या प्रमुख घटकांचा वृत्तांत या विभागात येतो. भारती विद्यापीठ वार्तामधून वाचकांना भारती विद्यापीठाच्या कार्याची माहिती होते.

सन १९७१ पासून स्थापन झालेल्या विचार भारती मासिक हे भारती विद्यापीठाच्या अनेक विभागापैकी एक महत्त्वपूर्ण विभाग आहे. एखाद्या मासिकाने आपले ध्येयधोरण प्रसिध्द करणे ही गोष्ट मोठी वैशिष्टयपूर्ण आहे त्यावरून एक गोष्ट सूचित होते की केवळ बाजारातील एक विक्रीयोग्य वस्तू म्हणून हे मासिक छापले जात नाही त्यामुळे आपणही त्याकडे तशाच गंभीरपणे पाहिले पाहिजे. ''समाजातील नव्या जाणिवांचा ध्यास, तरूण पिढीच्या विविध प्रश्नांचा विचार, वर्गीय जाती-वृत्ती प्रवृत्तीपलीकडे झेप, स्त्री-पुरूष समतेची प्रेरणा, लोकशाही मूल्यांची जोपासना, शिक्षण-संस्कृती आणि साहित्य यांचा विकास, विज्ञाननिष्ठ मानवतावादी दृष्टी या सर्वातून सर्वांगीण सामाजिक एकात्मता त्याचे

व्यासपीठ विचार-भारती "[१] याची साधने कुठली तरी विज्ञाननिष्ठ मानवतावादी दृष्टी ठेवून शिक्षण, संस्कृती आणि साहित्य यांचा विकास, शिक्षण ही माणूस घडविण्याची प्रक्रिया आहे ही एक अत्यंत गुंतागुंतीची क्रिया असून अनेक अंगानी त्याचा विचार करावा लागतो. शिक्षण चाकोरीबध्द आणि व्यवहारापासून तुटलेले असे व्हायला नको असेल तर पुन्हा पुन्हा त्याचे परीक्षण व्हायला हवे तसेच त्यासंबंधी नवनव्या तंत्राचा स्वीकार व्हायला हवा हे काम 'विचार-भारती' च्या माध्यमातून प्रभावीपणे केले जाते. वाढते औद्योगिकीकरण त्यामुळे होणारे शहरीकरण आणि घरटंचाई, विवाहाचे वाढते वय, व्यवहारात कुचकामी ठरणारे शिक्षण आणि त्यामुळे येणारी बेकारी, जुन्या पठडीत चालणाऱ्या संस्था आणि कुटुंबे आणि त्यामुळे आधुनिक विचारांची होणारी घुसमट यांची झळ तरूण पिढीला अधिक जाणवते आणि म्हणून त्यांच्या भावना व्यक्त होणे हे विचार-भारतीला महत्त्वाचे वाटते. भारती विद्यापीठाचे अध्यक्ष थोर विचारवंत यशवंतराव मोहिते हे विचार भारती चे प्रेरक आहेत त्याचे संस्थापक भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ.पतंगराव कदम हे आहेत. या विचार-भारती द्वारे महाराष्ट्रातील तरूणांमध्ये स्वतंत्रपणे एखाद्या विषयावर विचार करण्याची सवय लागावी व आज आपल्या देशातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक इत्यादी प्रश्नांचा सम्यक ज्ञानाचे आकलन त्यांना व्हावे अशी विचारधारा आहे. अशा प्रकारे कार्य विचार-भारती मासिक करत आहे.

**ग्रामीण साहित्यिकांचे संमेलन -**

ग्रामीण साहित्यिकांचे संमेलन भरविण्याची प्रथा भारती विद्यापीठाने १९७८ पासून सुरू केली. 'विचार-भारती' हे मासिक ग्रामीण साहित्यिकांचे व्यासपीठ बनले आहे. भारती विद्यापीठाने तरूण ग्रामीण लेखकांचा पहिला मेळावा २२ नोव्हेंबर १९७७ रोजी भारती विद्यापीठामध्ये आयोजित केलेला होता. पुणे येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला जोडून भारती विद्यापीठाच्या वैचारिक व्यासपीठामार्फत हा मेळावा घेतला. तरूण ग्रामीण साहित्यिकांच्या पहिल्या मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून २०० तरूण साहित्यिक मेळाव्याला उपस्थित होते. या मेळाव्यास प्रभाकर पाध्ये, नरहर कुरूंदकर, व्यंकटेश माडगूळकर, स.शि.भावे, डॉ.शंकरराव खरात, शंकर पाटील, द.मा.मिरासदार, डॉ.सरोजनी बाबर, राम पटवर्धन, डॉ.देवदत्त

दाभोळकर इत्यादी मान्यवर लेखक समीक्षक, शिक्षणतज्ज्ञ यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. दोन दिवसाच्या मेळाव्याचे नियोजन व सूत्रसंचालन डॉ.आनंद यादव यांनी यशस्वीपणे केले. अशा प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांच्या नेतृत्त्वाखाली ग्रामीण साहित्यिकांना त्यांचे विचार मांडण्याची संधी भारती विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्याला निश्चित स्थान प्राप्त होण्यास मदत होईल.

### ♦ डॉ.पतंगराव कदम यांनी सामाजिक बांधिलकीतून लोकांना व विविध संस्थांना केलेली मदत -

महात्मा फुले हे भारतीय समाजक्रांतीचे जनक आहेत. महात्मा फुले यांनी आपल्या समाजक्रांतीचा 'श्री गणेशा' शिक्षणाने पुणे येथे केला. याच पुण्यनगरीमध्ये धनकवडी येथे भारती विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याचा पसारा डौलाने उभा आहे. याशिवाय भारती विद्यापीठाची शैक्षणिक केंद्रे महाराष्ट्रभर पसरलेली आहेत. धनकवडी येथील ७० एकराच्या शैक्षणिक केंद्रात मेडिकल इंजिनिअरींग, पॉलिटेक्निक, ही महाविद्यालये, भारती हॉस्पिटल, मुलां-मुलींची वसतिगृहे इत्यादींची उभारणी डोळे दिपवणारी आहे.

''धनकवडी ही भूमी महात्मा फुले यांच्या कार्यांनी पुनीत झालेली. सन १८७७ च्या भयंकर दुष्काळामध्ये रोज दोन ते अडीच हजार भुकेल्या मुलांना नऊ महिने अन्नछत्र घालून धनकवडी भूमी महात्मा फुले यांनी पुनीत केली याच भूमीवर ग्रामीण भागातील, झोपडपट्टीमधील ज्ञानाला भुकेलेल्यांसाठी डॉ.पतंगराव कदम ज्ञानदानाचे काम करीत आहेत.''[१०] काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतची मुले-मुली येथे शिक्षणाकरिता येतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांनी परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होण्यासाठी दोन गाष्टीची आवश्यकता मानली. पहिली म्हणजे शिक्षण आणि दुसरी लोकजागृती, शिक्षणाचा अर्थ जीवनाला आवश्यक असणाऱ्या गरजांची पूर्तता करता येण्याची क्षमता प्राप्त करणे होय असा केला गेला म्हणून शिक्षणाकडून लोकशिक्षणाकडे जाणे महत्त्वाचे आहे असे महात्मा फुले यांनी मानून सार्वत्रिक शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणावरही अधिक भर दिला त्यामुळे शिक्षणाच्या चळवळीची दिशा ग्रामीण शिक्षण आणि मुलींचे शिक्षण इकडे वळली अशा तऱ्हेची चळवळ महर्षि कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केली. परंतु या चळवळीला ग्रामीण महाराष्ट्राच्या दिशेने नेण्याचे काम

डॉ.पतंगराव यांनी पुढे चालविले आहे. डॉ.पतंगराव यांची शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी शास्त्रीय लोकशाहीला पूरक अशी आहे. शिक्षण समाजभिमूख करण्याच्या दृष्टीने भारती विद्यापीठात विविध अंगी उपक्रम राबविले जातात हेच भारती विद्यापीठाचे वेगळेपण आहे. ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'सायमन कमिशन' पुढे १९२५ साली पुढील प्रमाणे साक्ष दिलेली होती. हिंदुस्थानातील शिक्षण अखिल जनतेसाठी नव्हे तर काही वर्गासाठीच आहे हे मोडून काढायचे असेल तर प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्यावाचून गत्यंतर नाही. मोफत व सक्तीचे शिक्षण, सार्वत्रिक साक्षरता, तांत्रिक शिक्षण, दलितांना शिक्षण, शिक्षण सुलभतेसाठी विद्यापीठाची स्थापना या पाच आधारावर शिक्षणाची रचना व्हायला हवी असे डॉ.आंबेडकरांचे म्हणणे होते.''[११] समाजाचा एकात्म विकास व्हायचा असेल तर शिक्षण आणि लोकजागृती हे महत्त्वाचे टप्पे ओलांडून जावे लागेल. शिक्षणविषयक डॉ.पतंगराव कदम यांचा विचार अत्यंत मूलगामी आहे ते म्हणतात ''मी ज्या पाऊलवाटेवरून आलो आहे ती पाऊलवाट मी केव्हाही विसरणार नाही. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आधुनिक काळाप्रमाणे त्यास शिक्षण दिले तर अनुकूल ग्रामीण पुनर्रचना व परिवर्तन शक्य आहे. शिक्षण हे अंतिम मानवी कल्याणासाठी असले पाहिजे. माणूस हा घटक महत्त्वाचा मानून इच्छूक उपेक्षित गरजू व या मातीचे ऋण मानणाऱ्या व्यक्तीला शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षणाचे स्वरूप काळाप्रमाणे आणि समाजाच्या बदलत्या गरजानुसार आधुनिक तसेच अनुकूल परिवर्तन करणारे असावे''[१२] शिक्षण हे माणसाला माणूस म्हणून आत्मविश्वासपूर्वक जीवन देणारे आणि भारतीय संस्कृतीची जोपासना करणारे असावे. सर्वांगीण अंतिम मानवी कल्याणासाठी मानवता हाच धर्म. मानवता ही जात असली पाहिजे त्यासाठी गतिमान शिक्षणातून अनुकूल सामाजिक परिवर्तन हा एक मार्ग आहे. प्रचलित गतिमान समाज व्यवस्थेचा शास्त्रशुध्द अभ्यास केला तर असे आढळते की समाजकल्याण आणि राजकारण यांची फारकत दिसून येत नाही. संकुचित आणि विध्वंसक शक्ती व अशाच विचारांपासून जनसामान्यांचे रक्षण करण्यासाठी आणि विधायक कार्याची योग्य नियोजन कार्यक्रमांच्या आधारे पूर्तता करण्यासाठी जनसामान्यांचे राजकीय नेतृत्व अत्यावश्यक आहे. जनसामान्यांना अशा राजकीय नेतृत्वाची ज्यावेळी गरज राहणार नाही त्यावेळी आपण केवळ सामाजिक व्यक्ती म्हणून राहिले पाहिजे.

डॉ.पतंगराव कदम यांच्या शैक्षणिक कार्याच्या आगळेपणाची अनेक वैशिष्टये आपणास पाहावयास मिळतात. आर्थिक अडचणीमुळे कोणा विद्यार्थ्याचे शिक्षण थांबता कामा नये असे डॉ.पतंगराव कदम म्हणतात याकरिता त्यांनी दत्तक योजना सुरू केलेली असून अनेक गरजू विद्यार्थ्यांना दत्तक योजनेतून मोफत शिक्षण दिले जाते. आज संस्थेमध्ये मुलां-मुलींकरिता अद्ययावत सर्व सोईनी युक्त अशी वसतिगृहे उभी आहेत परंतु सुरवातीच्या काळात शंकरराव मोरे विद्यालयाबरोबरच वसतिगृह बांधून गरीब तसेच ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांची सोय केलेली होती.

स्वतःची संस्था स्वावलंबी व्हावी कोणाचीही ती अश्रित राहू नये याकरिता या संस्थेने उत्पन्नाची साधने निर्माण केलेली आहेत. संस्थेची पहिली शाखा शंकरराव मोरे विद्यालयबरोबर प्रिटींग प्रेस व प्रकाशन हे विभाग सुरू केले असून त्याबरोबर सहकारी बँक स्थापन करून त्यातील २०% नफा शिक्षणाकरिता देण्याची तरतूद केली आहे तसेच 'भारती विद्यापीठ भवन' ही दहा मजली इमारतीतील सहा मजले भाडयाने दिले आहेत त्याचेही कायमस्वरूपी उत्पन्न संस्थेला मिळते. 'भारती विद्यापीठ' या नावामध्ये विशालता व राष्ट्रीयत्व आहे. सर्व धर्म,समभावाची दृष्टी यामध्ये आहे देशात राज्यात सार्वत्रिक जीवनात काम करणाऱ्या बहुतेक संस्था ठराविक धर्माच्या जातीच्या म्हणून ओळखतात परंतु भारती विद्यापीठामध्ये विविध जाती-धर्माची माणसे एकत्रित काम करतात हे चित्र दिसून येईल. पंजाब, कनार्टक, दिल्ली, काश्मिर, हरियाणा, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, केरळ, गुजरात, तामिळनाडू अशा देशभरातील विविध प्रांतातून विद्यार्थी येतात. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने सर्व धर्म समभावाची संस्कृती भारती विद्यापीठाने जोपासली आहे. क्र.२०

♦ **डॉ.पतंगराव यांनी विविध माध्यमातून केलेल्या मदती -**

(१) एतगांव येथील रयत शिक्षण संस्थेची धर्मराज विद्यालय व ज्यू.कॉलेज ही त्या गावातील एकमेव शाळा या शाळेमुळे गावातील मुलांची शैक्षणिक प्रगती होत होती. शाळेची स्वतःची इमारत होती. एक दिवस अचानक रात्री शाळेला आग लागली संपूर्ण इमारत आगीच्या भक्षस्थानी पडली. शाळेचे खूपच नुकसान झाले, मुलांच्या शाळेचा प्रश्न निर्माण झाला. डॉ.पतंगराव यांच्या कानावर ही बातमी जाताच डॉ.पतंगराव कदम त्या ठिकाणी आले सर्व गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या, शाळेचे

कर्मचारी, ग्रामस्थ यांच्याशी चर्चा केली आणि शाळेची गरज लक्षात घेऊन आर्थिक मदत केली व शाळा लवकरात लवकर उभी करण्यास सांगितले व शाळा सुरू झाली.

(२) कु.अनिता आनंदराव पाटील, सोनकिरे (खानापूर) हया मुलीची परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्यामुळे ती १२ वी पर्यंत शिकली आहे. पुढच्या शिक्षणाला घरातून विरोध होऊ लागला. डॉ.कदम एकदा गावात आले असताना त्या मुलीच्या भावाने भेटून सर्व परिस्थिती सांगितली त्यावेळी त्यांनी त्या मुलीला कन्या महाविद्यालयात प्रवेश दिला व तिची वसतिगृहात राहण्याची व भोजनाची मोफत सोय केली अशा प्रकारे अनेक लोकांना डॉ.पतंगराव कदम यांनी आर्थिक मदत केली आहे.

(३) सामाजिक बांधिलकीतून दरवर्षी ७५ लाखाच्या फी सवलती - अलीकडच्या काळात शिक्षणातून केवळ अभ्यासक्रमातील माहितीवजा ज्ञान देण्याऐवजी आधुनिक ज्ञानाबरोबरच नवीन पिढीमध्ये सामाजिक कर्तव्याचा जाणिवांचे दृढ संस्कार करण्याची गरज निर्माण झाली आहे. व्यक्तीबरोबर समाजामध्ये विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनी सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेच्या विधायक भूमिकेतून कार्य केले तर संपन्न व समृध्द समाजनिर्मितीस भरीव हातभार लागेल. संस्थेच्या परीक्षा विभागातील कार्य, ''विविध शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्य याद्वारे साहाय्य, उच्च शिक्षणामध्ये, फीमध्ये गरीब विद्यार्थ्यांना उदार सवलती हे कार्य संस्थेत सातत्याने सुरू आहे. केवळ गरिबीमुळे विद्यार्थी शिक्षणाला वंचित होऊ नये म्हणून भारती विद्यापीठाने अनेक विद्यार्थ्यांना दत्तक घेतले आहे.''[१३] या विद्यार्थ्यांचा निवास, भोजन व शिक्षण यावरील सर्व खर्च संस्था करते. उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना संस्था दरवर्षी लाखो रूपयांच्या सवलती देत असते अशा प्रकारे विविध क्षेत्रातून भारती विद्यापीठ ७५ लाखा पेक्षा जास्त फी सवलती देते.

(४) म्हसवड (सातारा) या ठिकाणी दर वर्षी सिध्दनाथाची मोठी यात्रा भरते. भाविकांना पाऊस-ऊन-वारा यापासून संरक्षण व्हावे म्हणून तेथे श्रीपतराव कदम स्मृती हॉल भाविकांच्या सोयीसाठी बांधला आहे.

(५) ग्रामीण भागात शिक्षणप्रसाराचे काम करणाऱ्या आर्थिक दृष्टया मागास शैक्षणिक संस्थांना बंधुत्वाच्या भावनेतून आर्थिक मदत केली आहे. रामानंदनगर, शिरसगांव, कडेगांव, तडसर, मोहित्यांचे-वडगांव, वांगी, बलवडी, कुंडल, दुधोंडी, खेराडी-वांगी, रामापूर या भागातील शैक्षणिक संस्थांना ~~भागाचा शैक्षणिक विकास व्हावा म्हणून~~ आर्थिक मदत केली आहे.

(६) थोर साहित्यिकांना मानधन - प्राचीन काळी लेखक वर्ग पुढारलेल्या वर्गातील होता हा पुढारलेला लेखक वर्ग स्वाभाविकपणे प्रभावी व सत्तासंपन्न राजसत्तेभोवती गोळा झाला. आपल्या लेखनाला राजसत्तेने मान्यता द्यावी त्याचे चीज व्हावे या हेतूने साहित्यिक राजसत्तेकडे धाव घेत होते. राजाश्रयाने वाङ्मयनिर्मितीस अनुकूल व प्रोत्साहात्मक वातावरण निर्माण करण्याचे कार्य पूर्वी केले आहे. ''पूर्वी राजाश्रयास एक चांगली परंपरा होती. राजा हा पंडितांचा आश्रयदाता असायचा. कलावंताचे जीवन राजाश्रयावरच सुखसमृध्द व्हायचे, विक्रम, भोज, हर्षवर्धन इ.राजांच्या दरबारात व्यास, कालिदास, बाणभट्ट, भवभूतीसारखे साहित्यिक राजाश्रयाने वाढले अकबराने आपल्या दरबारात नवरत्नांची नेमणूक करून तानसेनसारख्या कलावंतास आश्रय दिला होता. शिवाजी महाराजांच्या पदरी भूषणकवी होता. मोरोपंतांना पेशव्यांचे व्याही बाबूजी नाईक बारामतीकरांचा आश्रय होता''[१४] आजच्या लोकशाहीच्या युगात सरकारी पुरस्कार, बक्षीसे अनुदाने शिष्यवृत्त्या याद्वारे राजाश्रयाची परंपरा पुढे चालविली जात आहे. याची उदाहरणे म्हणून रमेश मंत्री यांनी भैरू दामानी, प्रियदर्शिनी, कोठावळे, विखे-पाटील यांनी जनस्थान या खाजगी क्षेत्रातील साहित्यविषयक पारितोषिकांनी साहित्यिकांना नवा धीर दिला आहे. म्हणून इतर उद्योगपतीनी अशीच पारितोषिक ठेवल्यास किंवा ग्रंथपारितोषिकांसाठी काही प्रकल्प योजून त्यासाठी अनुदान दिल्यास साहित्यजगतात चैतन्य येईल याच परंपरेचा भाग म्हणून भारती अभिमत विद्यापीठाचे संस्थापक-कुलपती डॉ.पतंगराव कदम यांनी वृध्द वयामध्ये साहित्यिकांची अवहेलना होऊ नये म्हणून पद्मश्री कवी सुधांशू यांना त्यांच्या वाङ्मयीन आणि सामाजिक कार्यासाठी तहहयात मानधन सुरू केले तसेच 'जिवाचा सखा' या चित्रपटाचे कथालेखक ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक

म.भा.भोसले, विनोदी कलाकार वसंत शिंदे, ज्येष्ठ साहित्यिक शंकरराव खरात यांना मानधन सुरू केले आहे.

(७) कै.वसंतदादा पाटील यांच्या स्मारकाची उभारणी -

महाराष्ट्राला दिशा देण्याचे आणि सहकार चळवळीत महाराष्ट्राला अग्रेसर करण्याचे कार्य महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतदादा पाटील यांनी केली त्यांच्या स्मारकाचा प्रश्न बरेच वर्षे रेंगाळला होता. मात्र डॉ.पतंगराव कदम उद्योग व जलसंधारण मंत्री झाल्यानंतर दादांच्या स्मारकाचा प्रश्न हाती घेऊन युध्दपातळीवर स्मारकाचे उभारणीचे कार्य कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून हाती घेतले. त्यांच्या स्मारकाच्या उभारणीच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळण्याचे कार्य व्हावे हा व्यापक उद्‌देश ठेवून स्मारकाची उभारणी सांगली येथे कृष्णा काठावर केली आहे.

(८) ग्रामीण विकासाच्या दृष्टीने शासनाच्या विविध योजना असतात. या योजनांद्वारा ग्रामीण भागाचा, समाजाचा सर्वांगीण विकास व परिवर्तन घडवून आणणे हा उद्‌देश असतो. या योजना कार्यान्वित करण्याच्या उद्‌देशाने डॉ.पतंगराव कदम यांनी वांगी-भिलवडी मतदार संघात 'ग्रामीण विकास प्रतिष्ठानची' स्थापना केली आहे. ग्रामीण विकास प्रतिष्ठान योजने अंतर्गत शेतकऱ्यांची तसेच स्त्रियांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी कुक्कुटपालन, दुग्ध उद्योग प्रकल्प, सामाजिक वनीकरण या योजना राबविल्या आहेत तसेच मतदार संघातील अनेक गावात सांस्कृतिक हॉल बांधले आहेत.

(९) भारती विद्यापीठात 'कमवा व शिका' योजना -

संस्थेने विद्यार्थी कल्याण-विभाग सुरू केला आहे. संस्थेत शिक्षण घेणारे काही विद्यार्थी गरीब व होतकरू आहेत. ज्यांची शिकायची ऐपत नाही. त्यांच्या करिता 'कमवा व शिका' अशी योजना तयार केलेली आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रेस, प्रकाशन, हॉस्पिटल अशा संलग्न संस्थात काम मिळवून दिले जाते. गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके वहया पेन अशा शालेय साहित्याचीही सुविधा उपलब्ध करून

दिली जाते. अशा प्रकारे निराधारांना आधार देण्याचे काम भारती विद्यापीठ करीत आहे.

### ♦ भारती हॉस्पिटलची स्थापना व त्याचे सामाजिक योगदान -

शैक्षणिक क्षेत्रातील अद्वितीय कामगिरीनंतर पुणे परिसरातील व पुणे जिल्हयातील दक्षिण भागातील ग्रामीण जनतेसाठी आरोग्य सेवेसाठी सर्व सुविधानी युक्त असे हॉस्पिटल नव्हते. सामान्य व गरीब माणसांना माफक दरामध्ये त्यांच्या आरोग्याची व्यवस्थित काळजी घेता यावी. पुण्यासारख्या शहरात खाजगी हॉस्पिटलची फी सामान्य जनतेला परवडत नाही. पैसा नाही म्हणून एखादयाला प्राण गमवावा लागतो. सामान्य माणसाला अल्प फीमध्ये एखादया रोगावर उपचार करता यावा म्हणून सर्व सुविधानी युक्त असे भारती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरची स्थापना ८ जानेवारी १९९३ रोजी धनकवडी पुणे येथे केली. या हॉस्पिटलचा उपयोग इंदिरानगर, बिबवेवाडी, सहकारनगर, धनकवडी, कात्रज, आंबेगांव तसेच भोर, पुरंदर, सासवड, जेजूरी, वेल्हा, दौंड या तालुक्यातील परिसरातील गरीब व मध्यमवर्गीय जनतेला होतो. या हॉस्पिटलचे एकूण क्षेत्रफळ १३२९४३ स्क्वेअर फूट असून त्यामध्ये जनरल हॉस्पिटलसाठी जरूरी असणारे सर्व विभाग उदा.एक्सरे, सोनोग्राफी, ब्लडबँक, लॅबोरेटरी, अतिदक्षता विभाग तसेच लहान मुलांसाठी खास अतिदक्षता विभाग २४ तास तातडीची वैद्यकीय सेवा अशा प्रकारे सर्व विभागात तज्ञ डॉक्टरांच्या ज्ञानाचा रूग्णांना फायदा होतो. ''पुण्याच्या दक्षिण भागात सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध असलेले हे एकमेव हॉस्पिटल आहे. सन २००१ अखेर ७०० खाटांचे अत्याधुनिक सोयीनी युक्त व प्रगत तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेले सुसज्ज हॉस्पिटल साकारले आहे''[१५] या हॉस्पिटलमध्ये एकूण ८ अद्ययावत ऑपरेशन थिएटर असून प्रत्येक विभागासाठी वेगळे ऑपरेशन थिएटर आहे याशिवाय हॉस्पिटलमध्ये पॅथॉलॉजी, क्ष-किरण, रक्तपेढी, औषधविभाग, हॉस्पिटलमधील रूग्णांसाठी तसेच बाहेरील डॉक्टरांनी पाठविलेल्या रूग्णांसाठी २४ तास कार्यान्वित आहेत.

**बाहयरूग्ण विभाग -** या विभागात अस्थिरोग, स्त्रीरोग, लहान मुलांचा विभाग, शस्त्रक्रिया, नाक, कान, घसा, डोळे, त्वचा रोग, मानसोपचार, क्षयरोग व छाती इ.विभाग कार्यान्वित आहेत त्यामध्ये तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून सकाळी ९ ते ४ या वेळेत माफक

नोंदणी शुल्क घेऊन तपासणी केली जाते याशिवाय संधीवात, मधुमेहाच्या रूग्णांसाठी विशेष विभाग कार्यान्वित आहेत.

**अंतररूग्ण विभाग -** यामध्ये मोफत जनरल वॉर्ड, सेमी प्रायव्हेट व प्रायव्हेट अद्ययावत अतिदक्षता विभाग, लहान मुलांचा अतिदक्षता विभाग, या विभागात तज्ञ व अनुभवी निवासी डॉक्टर २४ तास रूग्णसेवेसाठी उपलब्ध असतात.

**मोफत तपासणी शिबीर -**

पुणे शहर तसेच भोर, वेल्हे, पुरंदर व सातारा या परिसरातील ग्रामीण भागातील गरीब व गरजू रूग्णांना जास्तीत-जास्त वैद्यकीय सेवेचा लाभ व्हावा या दृष्टीने मोफत तपासणी शिबीरे आयोजित करण्यात येतोत. "सदर शिबीराचा लाभ आजअखेर २३३५७ रूग्णांनी घेतलेला आहे. त्यामध्ये पुरूष ११४९१ व स्त्रिया ९४३० व २८३६ लहान मुले आहेत, प्रत्येक शिबीरामधून १२० पेक्षा जास्त पेशंट ॲडमिट होतात."[१६] प्रत्येक शिबीरातील ६० ते ७० पेशटंची ऑपरेशन्स मोफत होतात. तसेच भारती हॉस्पिटलमध्ये दर बुधवारी दुपारी २ ते ४ या वेळात अगदी नगण्य खर्चामध्ये पुढील रोगांचे लसीकरण केले जाते. हिपॅटायटीस-बी, व्हॅक्शिन, एच.आय.व्ही. - व्हॅक्सिन, हिपॅटायटीस-ए व्हॅक्सिन, टायफाइड-व्हॅक्सिन, चिकनपॉक्स -व्हॅक्सिन, भारती हॉस्पिटल हे औषधोपचार व शस्त्रक्रिया विभाग यांचा समतोल व समन्वय राखणारे रूग्णालय आहे. या ठिकाणी शक्य तितक्या औषधोपचाराने बरे करण्याची पराकाष्टा केली जाते. नेहमीच शिबीरे भरवून तसेच दैनंदिन कार्यवाही मोठया संख्येने आलेल्या रूग्णांची तपासणी केली जाते.

भारती विद्यापीठाचे पहिले मेडिकल कॉलेज फेब्रुवारी १९८९ पासून सुरू झाले. नवीन इमारतीत सर्व सोयीनिशी १९९० मध्ये मेडिकल कॉलेज स्थलांतरित झाले. त्यानंतर १९९२ पर्यंत वैद्यकीय शिक्षणाच्या सर्व विद्याशाखीय अभ्यासक्रमाची सोय असलेले महाविद्यालये सुरू केली आहेत. यामध्ये डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, होमिओपॅथी कॉलेज, आयुर्वेद महाविद्यालय, कॉलेज ऑफ नर्सिंग यांचा समावेश होतो. त्यासाठी ७०० खाटांची सोय असलेले भारती हॉस्पिटल अँड मेडिकल रिर्सच सेंटर सुरू करण्यात आले. या हॉस्पिटलमध्ये सर्व आधुनिक उपकरणे, प्रयोगशाळा आणि तपासणी यंत्रे उपलब्ध आहेत. होमिओपॅथी आणि आयुर्वेद कॉलेज यासाठी स्वतंत्र रूग्णालये उभारली आहेत. एकाच

ठिकाणी आधुनिक आणि भारतीय चिकित्सा प्रणाली तसेच होमिओपॅथी एकत्र असल्याने तज्ञांची देवाण-घेवाण, संशोधन आणि परस्परपूरक रूग्ण चिकित्सा होऊ शकते. विविध वैद्यक विद्याशाखातील १ हजार पेक्षा अधिक तज्ञ डॉक्टर्स आणि तेवढयाच संख्येने असलेला पॅरा मेडिकल स्टाफ उपलब्ध असलेले भारती विद्यापीठ म्हणजे आरोग्य शिक्षण आणि रूग्णालय व्यवस्थापन यामध्ये शासकीय क्षेत्रातील सर्वात मोठी स्वयंसेवी संघटना ठरली आहे. प्रतिवर्षी या महाविद्यालयामधून प्रशिक्षित ४०० डॉक्टर्स आणि ३० नर्सेस बाहेर पडतात. भारतातील सध्याच्या सरासरी नुसार या वैद्यकीय डॉक्टर्समुळे ४ लाख लोकसंख्येची वैद्यकीय विद्याशाखा अंतर्गत चारही महाविद्यालये संबंधित वैधानिक शिक्षण परिषद तसेच केंद्र व राज्य सरकारे यामार्फत मान्यता प्राप्त आहेत. पालक, तज्ज्ञ डॉक्टर्स आणि वैधानिक शिक्षण परिषदांची तपासणी पथके यांनी या महाविद्यालयाची गणना अशियातील काही निवडक वैद्यक महाविद्यालयात केली आहे. गुणवत्तेच्या आधारे प्रवेश, अद्ययावत अभ्यासक्रम, पारदर्शी मूल्यमापन आणि स्पर्धात्मक शैक्षणिक वातावरण यामुळे वैद्यक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेला प्रतिवर्षी १० हजारपेक्षा अधिक विद्यार्थी बसतात. दर्जेदार व्यावसायिक आणि तंत्रशिक्षण सोयी यामुळे दरवर्षी १६५० इंजिनिअर्स, ११७० मॅनेर्जस, ४४० फार्मासिस्टर्स, ४०० कॉम्प्युटर प्रोफेशन्लस, १८० हॉस्पिटल मॅनेजर्स, २० आर्किटेक्चर्स भारती विद्यापीठातून बाहेर पडतात. ही विद्यार्थी आकडेवारी सातत्याने वाढत आहे. अशा प्रकारे आरोग्य, तंत्रज्ञान, व्यावसायिक शिक्षण, संगणकशास्त्र इ. ज्ञानशाखात शिक्षण सोयी वाढवून डॉ.पतंगराव कदम यांनी देशातील संपूर्ण शिक्षण व्यवस्थेपुढे सामाजिक आदर्श निर्माण केला आहे.

पुणे येथे भारती अभिमत विद्यापीठाच्या वतीने व मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेजच्या सभागृहात दि.३ ते ५ डिसेंबर ९९ रोजी जागतिक जरावस्था व जराचिकित्सा परिषद उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. आंतरराष्ट्रीय जागतिक संघटना (युनो) १९९९ हे वर्ष 'जागतिक वृध्द' वर्ष म्हणून घोषित केलेले होते त्याचाच एक भाग म्हणून या महत्त्वपूर्ण परिषदेचे आयोजन केले होते. त्या निमित्ताने भारती हॉस्पिटलमध्ये वृध्दांसाठी बाहयरूग्ण विभाग चालू केला आहे. तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील औषधीशास्त्र विभागातील प्रा.डॉ.शशिकांत करंदीकर यांच्या अधिपत्याखाली 'जरावस्था आणि जराचिकित्सा संशोधन

सेंटर फॉर जेरॉटॉलॉजी अॅन्ड जेरियाट्रिक रिसर्च, पुणे हे कार्यान्वित झाले आहे. अशा प्रकारचे आरोग्य विषयक सुविधांसाठी नवनवीन उपक्रम भारती विद्यापीठ राबवत आहे यामुळे वृध्द लोकांच्या आरोग्य विषयक सुविधांसाठी संशोधनाला वाव मिळणार आहे. वृध्द लोकांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणार आहे.

**♦ डॉ.पतंगराव कदम यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान -**

**(१) कराडमधील सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात कै.अभिजीत कदम क्रीडा संकुल -**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील क्रीडा संकुल वगळता, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागाच्या ठिकाणी कोठेही सर्व सुविधांनी युक्त असे भव्य क्रीडा संकुल नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंच्या क्रीडा गुणांना क्रीडा गुणवत्ता असून देखील संधी प्राप्त होत नाही. त्यामुळे त्यांच्या खेळाडू वृत्तीचा विकास होत नाही आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळात पाठीमागे राहतात. म्हणून सातारा जिल्हयातील ग्रामीण विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन कराड सारख्या सातारा जिल्हयाच्या मध्यवर्ती ठिकाणी सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात नियोजित अभिजीत पतंगराव कदम क्रीडा संकुल डॉ.पतंगराव कदम यांच्या सहकार्याने साकारत आहे. सुमारे ६८ लाख पेक्षा जास्त रूपये खर्चून ८९६ चौरस मीटरचे हे क्रीडा संकुल म्हणजे सातारा जिल्हयातील क्रीडापटूंना वरदार ठरणार आहे. या संकुलात बास्केटबॉल, व्हॉली बॉल, बॅडमिंटनचे प्रत्येकी एक कोर्ट, टेबल टेनिससाठी सहा टेबलांची सुविधा, मॅट रेसलिंगची उपलब्धता, सुमारे ६०० प्रेक्षकांना बसण्यासाठी प्रेक्षागाराची व्यवस्था, खेळाडूसाठी स्वतंत्र सुविधा, जिम्नॅशियम हॉल व खेळाडूंच्या सुलभ हालचालीसाठी लाकडी फ्लोअरींग व अत्याधुनिक प्रकाश योजना करण्यात येणार आहे. हे क्रीडा संकुल सातारा जिल्हयातील एकमेवाद्वितीय असे समृध्द व भव्य क्रीडा संकुल असेल या संकुलाच्या उभारणीची जबाबदारी डॉ.पतंगराव कदम यांनी घेतली आहे. केवळ भारती विद्यापीठ वाढवण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत असे नाही तर ज्या रयत शिक्षण संस्थेत ते शिकले त्या कर्मवीरांचा विचार पुढे चालवून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याला समर्थ अभिवादन ते करतात यातच त्यांच्या समाजशील समाज मानसिकतेचे खरे दर्शन घडते. या अभिजीत कदम क्रीडा

संकुलाचा कोनशिला समारंभ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत दि.९ सप्टेंबर २००० या दिवशी संपन्न झाला.

या क्रीडा संकुलाची वैशिष्टये पुढील प्रमाणे -

(१) जिल्हयातील एकमेव अत्याधुनिक क्रीडा संकुल

(२) १००० प्रेक्षक क्षमतेची अंतर्गत गॅलरी

(३) संकुलात बास्केटबॉल, बॅडमिंटन, जिमनॅस्टिक्स, मल्टीजिमनॅशिअम, व्हॉली बॉल, टेबल टेनिस, मॅटवरील कुस्ती इत्यादीच्या अत्याधुनिक सुविधा.

(४) ९२ फूट लांब व ५० फूट रूंद वूडन फ्लोअरींग

(५) संकुलाची एकूण लांबी १२१ फूट, रूंदी ११४ फूट तर उंची ५५ फूट एकूण खर्च अंदाजे ८० लाख रूपये आहे.

अशा प्रकारे जगाच्या तुलनेत भारताची लोकसंख्या १०० कोटीपेक्षा जास्त आहे. परंतु कॅनडा सारखे छोटे राष्ट्र क्रीडा क्षेत्रात भारताच्या पुढे आहे ही बाब खेदजनक आहे. भारत खेळामध्ये पूर्णपणे पाठीमागे राहिला आहे. त्यामुळे अशा प्रकारची संकुले प्रत्येक कॉलेजवर झाली पाहिजेत व डॉ.पतंगराव कदम यांच्यासारख्यांनी सेवाभावी वृत्तीने ही जबाबदारी उचलली पाहिजे तरच भारताला खेळात भवितव्य राहिल यावरून डॉ.पतंगराव कदम यांचा प्रत्येक क्षेत्राकडे सेवावृत्तीने पाहण्याचा सामाजिक स्थायीभाव दिसून येतो.

**(२) भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय आंतर-महाविद्यालयीन स्पर्धा -**

भारती विद्यापीठ हे देशातील एक दर्जेदार विद्यापीठ म्हणून ओळखले जाते. सर्व सुविधायुक्त सुसज्ज इमारती, तज्ञ शिक्षक वर्ग यासर्व गोष्टीमुळे भारती अभिमत विद्यापीठ गुणवत्ता टिकवून आहे. अभ्यासाबरोबर भारती विद्यापीठातील विद्यार्थी खेळात पाठीमागे राहू नये म्हणून भारती अभिमत विद्यापीठामार्फत दरवर्षी स्पर्धा घेतल्या जातात. सन २०००-२००१ च्या स्पर्धेचे उद्‌घाटन भारती विद्यापीठाचे सहकार्यवाहक श्री विश्वजित कदम व क्रीडा विभागाचे अध्यक्ष के.डी.जाधव यांच्या हस्ते धनकवडी शैक्षणिक केंद्र क्रीडांगणावर पार पडल्या. या स्पर्धेतून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड होते. यात खालील स्पर्धेचा समावेश करण्यात आला. क्रिकेट (मुले),

बास्केट बॉल (मुली), बॉस्केट बॉल (मुले), खो-खो (मुले), हॅन्ड बॉल (मुले), हॅन्ड बॉल (मुली), टेबल टेनिस (मुले), फुटबॉल (मुले), हॉलीबॉल (मुले), बॅडमिंटन (मुले).

अशा प्रकारच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळामध्ये भाग घेण्यास संधी उपलब्ध होते. यातूनच भारती विद्यापीठातून अनेक मुले राष्ट्रीय खेळाडू म्हणून तयार झाली आहेत.

**♦ डॉ.पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या वतीने सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात सुरू केलेले पुरस्कार -**

**(१) समाजातील गुणवंतांना 'भारती विद्यापीठ पुरस्कार' -**

"विविध क्षेत्रात असामान्य कार्य करणाऱ्या व्यक्ती समाजास दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश देतात अशा गुणवंत व्यक्तीचा आदर्श नवीन पिढीसमोर सतत राहावा व उदयोन्मुख तरूण पिढीला त्यांच्या कार्यापासून प्रेरणा मिळावी."[१७] तसेच थोर गुणवंत व्यक्तीचा सेवाभावी कार्याचा गुणगौरव व्हावा या उद्देशाने दरवर्षी भारती विद्यापीठ आपल्या वर्धापन दिनी म्हणजे १० मे रोजी समाजातील गुणवंत कीर्तीवंत व्यक्तींना 'भारती विद्यापीठ पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करीत असते. आजपर्यंत पुढील व्यक्तींना हा पुरस्कार दिला आहे. प्रसिध्द संगीतकार श्री राम कदम, उपराकार लक्ष्मण माने, पाणी पंचायतीचे जनक विलास साळुंखे, शिक्षणतज्ज्ञ डॉ.चित्रा नाईक, कुलगुरू डॉ.राम ताकवले,रामोशी समाज चळवळीचे नेते श्री बाबासाहेब जाधव,डॉ.सरोजिनी बाबर, सोलापूरचे स्वातंत्र्य सैनिक श्री चंद्राम गुरूजी, दै.संध्याचे संपादक वसंतराव काणे इ. मान्यवरांचा भारती विद्यापीठाने गुणगौरव केला आहे.

**(२) कै.अभिजीत कदम स्मृती प्रित्यर्थ पुरस्कार -**

कै. अभिजित कदम स्मृती प्रित्यर्थ मानवता पुरस्कार हा वेगळा पुरस्कार देण्यात येणार आहे. पुणे महसूल विभागातील पुणे, सातारा, सांगली,कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्हयाच्या हद्दीतून पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ व पुणे-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.९ हे दोन महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग जात असून या महामार्गावर बऱ्याच वेळा वाहनांचे अपघात होत असतात व त्यांना वेळेवर वैद्यकीय मदत न मिळाल्याने मृत होणाऱ्या

व्यक्तींची संख्या ही जास्त आहे. त्यामुळे पुणे महसूल विभागाच्या हद्दीत राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या अपघातात जखमी होणाऱ्या व्यक्तींना उत्तेजन मिळावे म्हणून स्व.अभिजीत कदम यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था अथवा व्यक्ती यांची निवड करण्यात येणार असल्याचे डॉ.पतंगराव कदम यांनी २००१-२००२ सालापासून जाहीर केले आहे. २५ हजार रोख व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**(३) आदर्श महाविद्यालय, आदर्श शाळा, आदर्श हिशोबनीस पुरस्कार -**

भारती विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांचे काम अधिक क्षमतेने होण्यासाठी भारती विद्यापीठामार्फत दि.२७ फेब्रुवारी २००१ पासून आदर्श महाविद्यालय, आदर्श शाळा, आदर्श हिशोबनीस (शालेय शिक्षण), आदर्श हिशोबनीस (उच्च शिक्षण) असे पुरस्कार प्रदान करण्यास सुरवात झाली आहे. सदरचे पुरस्कार दर दोन वर्षांनी देण्यात येणार असून आदर्श महाविद्यालयासाठी रोख रूपये २५००१ आणि चषक, आदर्श शाळेसाठी रोख रूपये २५००१ व चषक, आदर्श हिशोबनीससाठी रूपये ७५०१ व स्मृतीचिन्ह आणि आदर्श हिशोबनीस (उच्च शिक्षण) साठी रूपये ११००१ व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराचे प्रथम मानकरी आदर्श शाळा भारती विद्यापीठ बहुउद्देशीय कन्या प्रशाला कडेगांव (सांगली), आदर्श हिशोबनीस (उच्च शिक्षण) श्री अशोक पांढरे, आदर्श हिशोबनीस (शालेय शिक्षण) संजय मोहिते यांना मिळाले आहेत. अशा रीतीने भारती विद्यापीठाचे व कॉलेज, शाळेचे कामकाज व्यवस्थित चालावे यासाठी प्रोत्साहनात्मक पुरस्कार सुरू केले आहेत.

**(४) कै.अभिजीत कदम फुटबॉल खेळाडू चषक -**

कै.अभिजीत कदम यांना फुटबॉलची अतिशय आवड होती त्यांची ही आवड लक्षात घेऊन भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय पुरस्कृत कै.अभिजीत कदम यांच्या स्मरणार्थ पुणे शहर अंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत प्रत्येक वर्षी जो संघ प्रथम व द्वितीय येईल त्या संघास फिरता चषक ठेवण्यात आला आहे. २००१ चा चषक नेसवाडिया महाविद्यालय पुणे व सिम्बॉयसिस आर्टस, कॉमर्स महाविद्यालय, पुणे यांना देण्यात आला.

**(५) डॉ.पतंगराव कदम फाऊंडेशन, कोल्हापूर -**

''भारती विद्यापीठाचे शिल्पकार आणि शिक्षण सहकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे समर्थ नेतृत्व डॉ.पतंगराव कदम यांच्या नावाने कोल्हापूर येथे 'डॉ.पतंगराव कदम फाऊंडेशन, कोल्हापूर' ही संस्था प्रा.दिनकर पाटील यांनी ८ जानेवारी १९९५ रोजी स्थापन केली. ही संस्था १२ जानेवारी १९९६ रोजी महाराष्ट्र नोंदणी क्रमांक ११३२६ कोल्हापूर आणि सार्वजनिक विश्वस्त नोंदी क्रमांक १२१७ कोल्हापूर या प्रमाणे नोंदणी करून घेतली आहे.''[१८] संस्थेचा उद्देश महाराष्ट्र राज्य पातळीवरील साहित्य क्षेत्रातील व्यक्तिंना डॉ.पतंगराव कदम पुरस्कार देणे यामध्ये चरित्र, आत्मचरित्र, नाटक, काव्यसंग्रह, ललितलेखन, ऐतिहासिक प्रवास वर्णन, शैक्षणिक व सामाजिक आणि राजकीय अशा विविध क्षेत्रातील लेखनास डॉ.पतंगराव कदम पुरस्कार देणे, साहित्य संमेलन भरविणे, पुस्तके प्रकाशित करणे, डॉ.पतंगराव कदम यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणे. ग्रामीण साहित्य, शेतकरी, कामगार, दलित, श्रमिक, विद्यार्थी, स्त्रिया, आदिवासी, शेतमजूर यांच्या साहित्याची चर्चासत्रे घेणे, समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव डॉ.पतंगराव कदम पुरस्कार देऊन करणे हा आहे.

आजपर्यंतच्या पुरस्काराचे मानकरी -

(१) श्री उत्तमराव जाधव (उद्योजक) पलूस (सांगली)

(२) सौ.कुसूमताई नागनाथ नायकवडी (शिक्षण) वाळवे (सांगली)

(३) श्री श्याम कुरळे (साहित्यिक) भोगावती, कोल्हापूर

(४) श्री वसंतराव पाटील (सामाजिक कार्य) दहिवडी (सातारा)

(५) डॉ.शरद सावंत (वैद्यकीय) मुंबई

(६) क्रांतिवीर श्री आर.एस.पवार (शेती) कुंडल, मुंबई

(७) आमदार श्री पांडूरंग अभंग (सहकार) नेवासा, अहमदनगर

(८) प्रा.रमेश डुबल (शिक्षण) वाई, सातारा

अशा प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांनी सामाजिक राजकीय, आर्थिक, सहकार, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक बांधिलकी म्हणून विविध क्षेत्रात पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्याचे ठरविले आहे.

♦ **समारोप -**

प्रकरण तीन मध्ये डॉ.पतंगराव कदम यांच्या सामाजिक व सांस्कृतिक नेतृत्वाचा अभ्यास केला आहे. भारतामध्ये महाराष्ट्र हे सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया पुढारलेले राज्य आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांपासून ते महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील ते आजचे बाबा आमटे यांनी त्या त्या कालखंडात सामाजिक सुधारणांचे कार्य केले आहे. डॉ.पतंगराव कदम यांनी शिक्षणातून सामाजिक सुधारणा घडवून एक वेगळा आदर्श घालून दिला आहे. तसेच कडेगांव सारख्या माळरानावर स्वतःच्या मतदार संघात महिलांसाठी शैक्षणिक संकुल उभे केले आहे. त्या ठिकाणी अनेक मुली दत्तक घेऊन त्यांना जीवनाचा मार्ग खुला करून दिला आहे. पुण्यात धनकवडी येथे भारती हॉस्पिटल हे सर्व अत्याधुनिक सोयींनी युक्त असे हॉस्पिटल उभारले आहे. त्या ठिकाणी अनेक मोफत शिबीरे आयोजित करून अनेक लोकांचे जीवन पुन्हा उभारले आहे. तसेच विविध क्षेत्रामध्ये समाजातील लोकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध पुरस्कार सुरू केले आहेत. भारतामध्ये दहा टक्के समाज हा अतिश्रीमंत समाज आहे. त्यांना पैशावर टॅक्स दयावा लागतो तर दुसरीकडे असा समाज आहे की ज्याला दोन वेळच्या जेवणासाठी संघर्ष करावा लागतो. जर ही परिस्थिती बदलावयाची असेल तर श्रीमंत लोकांनी सामाजिक बांधिलकीतून गरीब समाजाची जबाबदारी उचलली पाहिजे अशाच प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांनी त्यांच्या परीने त्यांच्या मतदार संघात, जिल्हयात व महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी सामाजिक कार्य केले आहे.

## संदर्भ सूची

१. रा.म.वीर, 'वर्तमानातून भविष्याकडे झेपावणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्व' विचार-भारती द्वैमासिक, संपा.डॉ.कल्याणी दिवेकर, डिसेंबर-जानेवारी १९९६ अंक ४ था, पृ.९६

२. शिवाजी बोऱ्हाडे, 'दृष्टीक्षेप कडेगांवचे आदर्श महिला शैक्षणिक केंद्र' विचार भारती, संपा.कन्हैया कुंदप,जून-जुलै २००१ अंक २ रा पृ.३०

३. उपरोक्त - पृ.३५

४. संजय सपकाळ, कृष्णा कोयना उपसा जलसिंचन प्रकल्प ताकारी योजना - एक अभ्यास एम.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास सादर केलेला अप्रकाशित शोधप्रबंध, जून २०००, पृ.७७

५. उपरोक्त - पृ.७८

६. डॉ.सिंधू कुलकर्णी,'ग्रामीण विकासातील डॉ.पतंगराव कदम यांचे योगदान विचार-भारती, संपा.रघुनाथ मिरगुंडे, डिसेंबर-जानेवारी १९९९ अंक ७ वा, पृ.४३

७. नाना बढे, 'सुरूवातीचे दिवस' विचार भारती, संपा.रघुनाथ मिरगुंडे , एप्रिल-मे १९९८ अंक ३ रा, पृ.२८

८. बा.ग.पवार, 'सोनहिरा' मातृभूमी प्रकाशन पुणे, १ जानेवारी १९९६ आवृत्ती पहिली, पृ.८५

९. कल्याणी दिवेकर, 'विचार-भारती' एक जीवन होकायंत्र' विचार भारती द्वैमासिक, एप्रिल-मे १९९६ अंक १ ला, पृ.२६

१०. बा.ग.पवार, 'सोनहिरा' मातृभूमी प्रकाशन पुणे, १ जानेवारी १९९६ आवृत्ती पहिली, पृ.१२२

११. उपरोक्त - पृ.१२३

१२. उपरोक्त - पृ.१२४

१३. : . वसंत माने, 'गतिमान शिक्षण संस्था भारती विद्यापीठ' संपा. रघुनाथ मिरगुंडे, डिसेंबर-जानेवारी अंक - ७ वा, पृ.७९

१४. विलास पाटील, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचा चिकित्सक अभ्यास (१८७८-१९९५) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अप्रकाशित प्रबंध सन २००१, पृ.२०८

१५. दै.केसरी, पुणे 'पुण्याची नवीन वैद्यकीय क्षितीजे' पुरवणी, २६ डिसेंबर २००१ पृ.४

१६. उपरोक्त - पृ.४

१७. वसंत माने, 'गतिमान शिक्षण संस्था भारती विद्यापीठ' विचार भारती, संपा.रघुनाथ मिरगुंडे, डिसेंबर-जानेवारी अंक - ७ वा, पृ.७९

१८. दिनकर पाटील, डॉ.पतंगराव कदम अभिनंदन अंक,सन २००१

****